# निशाणी क्र. १२७ वरील आदेश

वादीने प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. २ यांचे वारस अभिलेखावर दाखल करणेसाठी केला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, या कामातील प्रतिवादी क्र. २ प्रकाश सहदेव परब हे दि.०६/०६/२०२१ रोजी मयत झाले आहेत. प्रतिवादी क्र. २ यास चार मुली आणि एक मुलगा असे पाच हयात वारस आहेत. तरी त्यांना वारस म्हणून सामील करण्यात यावे व तशी दुरुस्ती दाव्यात करण्यास परवानगी मिळावी अशी विनंती प्रस्तूत वादीने केली आहे. सदर प्रतिवादीस खालीलप्रमाणे वारस आहेत.

प्रतिवादी क्र. २ – प्रकाश सहदेव परब – मयत वारस

अ) शितल प्रकाश परब उर्फ
शितल विश्वजीत तावडे,
वय – ४३ वर्षे, धंदा – घरकाम,
रा.–९०१, आर्य चाणक्य नगर, आकुर्ली रोड,
शिल्पकार बिल्डींग नं. ३, रुम नं. १६, कांदीवली पू. मुंबई.

ब) सुषमा प्रकाश परब उर्फ
सुषमा गणेश तावडे,
वय – ४० वर्षे, धंदा – घरकाम,
रा. – ए/६, संतोषीमाता को.ऑप.हाऊसिंग सोसायटी,
नटवर नगर रोड नं. १, पी.पी.डायस कंपाऊंड,
जोगेश्वरी पूर्व, मुंबई.

क) मनिषा प्रकाश परब उर्फ
अपेक्षा रमेश मोरे,
वय – ४५ वर्षे, धंदा – घरकाम,
रा. – ए–४, दिपा अरीहंत, न्यू मणीकलाल इस्टेट,
नारसी मेहता मार्ग, घाटकोपर पश्चिम मुंबई.

ड) निलेशा प्रकाश परब उर्फ
अनुष्का संतोष सावंत,
वय –४३ वर्षे, धंदा – मच्छीमारी,
रा. – द्वारा शितल तावडे, ९०१, आर्य चाणक्य नगर,
आकुर्ली रोड, शिल्पकार बिल्डींग नं. ३, रुम नं. १६,
कांदीवली पूर्व, मुंबई.

इ) निलेश प्रकाश परब,
वय – ३८ वर्षे, धंदा – नोकरी,
रा. – २६०, हिमगिरी सोसायटी, रुम नं. डी–४६,
सेक्टर –, इंडियन एज्युकेशन सोसायटी हायस्कूल जवळ,
चारकोप, कांदीवली पश्चिम मुंबई.

सबब वर नमूद केलेप्रमाणे सदर प्रतिवादी क्र. २ चे कायदेशीर वारस आहेत. याशिवाय अन्य कोणीही प्रस्तूत प्रतिवादी यास वारस नाहीत. तरी सदर वारसांना दाव्यात सामील करुन मिळणेस व त्याप्रमाणे दाव्याचे कामी तशी दुरुस्ती करणेस परवानगी मिळावी अशी विनंती प्रस्तूत वादीने केली आहे.

२. प्रतिवादी यांनी सदर अर्जावर म्हणणे दाखल करुन हरकत घेतली आहे. त्यांचे म्हणण्यानुसार, सदरचा अर्ज खोट व खोडसाळ आहे. सबब अर्ज नामंजूर करणेत यावा.

३. वादी व प्रतिवादी यांच्यातर्फे विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

४. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २२ नियम ३ नुसार वादी, प्रतिवादी मयत झालेस त्याच्या वारसांना दाव्यात समाविष्ट करून घेणेची तरतूद आहे. प्रस्तूत प्रतिवादी क्र.

२ हे मयत झाले आहेत, याबाबत वाद दिसून येत नाही. वादी यांनी सदरचा दावा वाटप व पृथक कब्जाकरीता दाखल केला आहे. सदर दाव्याचे कामी सदरची दुरूस्ती महत्वाची आहे. सदर दाव्यास प्रस्तूत प्रतिवादीचे वारस हे आवश्यक पक्षकार आहेत. सबब त्याप्रमाणे दाव्यात दुरूस्ती करणेस परवानगी देणे उचित वाटते. त्यामुळे सदर अर्ज मंजूर करणे न्यायोचित वाटते. सबब खालील आदेश पारीत करीत आहे:

**– आदेश –**

१. प्रस्तूतचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रस्तूत प्रतिवादी क्र. २ चे वारस दाव्यात समाविष्ट केल्यानंतर वादीने दाव्यात दुरूस्ती करून दाव्याची दुरूस्ती प्रत दाखल करणेची आहे.

३. खर्चाबाबत आदेश नाही.

स्थळ : देवगड
दिनांक: ०३/०१/२०२२

( बी.आर.पाटील )
दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड.

Digitally signed by BALKRISHNA RAJARAM PATIL
Date: 2022.01.04 10:48:58 +0530